**नियमीत दिवाणी दावा क्र.२५५/२०२५**
**(जुने नि.दि.दा.क्र.५२/२०१८)**
**CNRNOMHOS120003962025**
**मैनाबाई वि. रुक्मीणबाई व इतर**
**नि.क्र. ७१ खालील आदेश**
**(आदेश दि.१९/०१/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४/अ व ५ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन अर्जासोबत दाखल केलेली लेखी कैफियत स्वीकारण्यासाठी केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, सदरचे प्रकरणात विधिज्ञ श्री. ए.एस. पाटील हे प्रस्तुत प्रतिवादी यांच्याकडुन कामकाज पाहत होते. त्यांचे अपघातील निधन झाल्यामुळे सदरील प्रकरणाबाबत योग्य ती माहिती वेळेत न मिळाल्यामुळे तसेच या प्रतिवादींची विवाद्य जमीनीबाबत वेगवेगळया न्यायालयात अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे सदरील प्रकरणाची कागदपत्रे वेळेवर जमा करण्यास प्रतिवादींना वेळ लागला आहे. त्यामुळे दिनांक २१.०६.२०१८ रोजी प्रतिवादी क्र.४/अ व ५ यांनी कैफियत दाखल केली नाही म्हणुन त्यांच्याविरोधात विनाकैफियत आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादीने जाणीवपुर्वक कैफियत देण्याचे टाळलेले नाही. प्रकरण स्थावर मिळकतीचे असून सदरील प्रकरणात या प्रतिवादींचे हित संबंध गुंतलेले आहे. कैफियत न स्विकारल्यामुळे प्रतिवादी यांचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले आहे की, सदरचे प्रकरण फार जुने आहे. प्रस्तुत प्रतिवादींना अनेकवेळा संधी देऊनही त्यांनी जाणुन-बुजुन प्रकरणास विलंब व्हावा म्हणुन त्यांनी कैफियत दाखल केली नाही. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती

केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, प्रस्तुत प्रतिवादींच्या विरुध्द दिनांक २१.०६.२०१८ रोजी विनाकैफियत आदेश पारीत झालेला आहे. हे स्पष्ट आहे की, प्रतिवादीने विहित मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुत दावा अद्याप सुनावणीला लागलेला नाही. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ प्रतिवादी क्र. ४/अ ने स्वत:चे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जात नमूद केलेले कारणाचा विचार करता व दाव्याचा गुणदोषावर निकाल करण्याच्या हेतूने प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४/अ व ५ यांनी प्रत्येकी रक्कम रुपये १,०००/- इतकी कॉस्ट वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत प्रतिवादींनी सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.01.20 11:45:12 +0530

दिनांक – १९.०१.२०२६

( राहुल द. डांगे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 19/01/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 19/01/2026 |
| Order uploaded on | --- | 19/01/2026 |